# कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण.

**मुख्य कार्यालय:** शंकरराव चौक, महानगरपालिका मुख्यालय समोर, कल्याण (पश्चिम) ४२१३०१
**Gmail Add:** kalyandombivlitransport@gmail.com

**जा.क्र./कडोंमपा/परि/मुका/**
**दिनांक :-** /१२/२०२४

**-: कंत्राटी भरती जाहिरात :-**

कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. च्या विवक्षित कामांसाठी बेस्ट व राज्य मार्ग परिवहन महामंडळ मधील प्रदिर्घ अनुभव असलेले **सेवा-निवृत्त** अधिकाऱ्यांच्या सेवा निव्वळ ठोक मानधनावर "**करार पध्दतीने**" घेणेकामी **सेवा-निवृत्त** झालेल्या अधिकारी यांचेकडून दिनांक २०/१२/२०२४ ते दिनांक ३१/१२/२०२४ या कालावधीत खालील पदांकरिता ऑफलाईन अर्ज मागविणेत येत आहेत. यापूर्वी ज्या उमेदवारांनी अर्ज केले होते, ते सुध्दा पुन्हा एकदा अर्ज करु शकतात.

**करार पध्दतीने घेण्यात येणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | पात्रता / अर्हता |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय अधिकारी | ०१ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>• BEST अथवा MSRTC संस्थेतील प्रशासकीय सेवेचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २ | व्यवस्थापकीय अधिकारी, वाहतुक | ०१ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>• BEST अथवा MSRTC संस्थेतील वाहतुक व्यवस्थापन सेवेचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>• कंपनी कायदा, औद्योगिक कलह कायदा, मोटार वाहन कायदयाची माहिती / ज्ञान आवश्यक. |
| ३ | सनदी लेखापाल / कंपनी सेक्रेटरी | ०१ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी.<br>• उप लेखापाल / लेखाधिकारी या पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव.<br>• अंदाजपत्रक तयार करणे, संचालक मंडळाची मंजूरी, बसेस खरेदी, आगार बांधणी व तत्सम कामाकरिता वित्तीय संस्थांकडून कर्ज पुरवठा करुन घेणे, खर्जावर नियंत्रण ठेवणे, वार्षिक उत्पन-खर्च ताळेबन्ध, वित्तीय अहवाल, गुतवणुक प्रस्ताव सादर करणे यासह संस्था नोंदणी, सामंजस्य करार, लेखा परीक्षण इ. कामांकरिता सनदी लेखापाल / कंपनी सेक्रेटरीची पदवी आवश्यक. |
| ४ | व्यवस्थापकीय अधिकारी (IT) | ०१ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी.<br>• माहिती तंत्रज्ञान, संगणक विज्ञान किंवा सॉफ्टवेअर अभियांत्रिकी या क्षेत्रातील अनुभव आवश्यक.<br>• माहिती तंत्रज्ञान आणि माहिती शास्त्र कार्यक्रमातील बी. एस प्रोग्रामिंग, डेटा व्यवस्थापन, नेटवर्किंग, मोबाईल सिस्टम, नैतिकता आणि सुरक्षा यासह संगणक नियोजन संबंधी IT क्षेत्रातील विशेष प्राविण्य अवश्यक. |

**उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या सेवा निवृत्त उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.**

❖ **अटी व शर्ती :**

१) संबंधित इच्छुक उमेदवारांनी मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, KMPML यांचे नावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रम मुख्यालय, महापालिके-समोर, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) या ठिकाणी दिलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यातील अर्ज स्वत: कार्यालयात सादर करावेत.

२) विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेवून ते काम पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करणेत येईल. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यांसाठी देण्यात येईल. आवश्यकतेनूसार वाढीव कालावधीसाठी पुढे नुतणीकरण करण्यात येईल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

३) सेवा निवृत्त उमेदवाराने सेवा निवृत्ती झाल्याचे सेवा निवृत्ती प्रदान आदेश अथवा कार्यालय प्रमुखांचा सेवा निवृत्त कार्यमुक्तीचा आदेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सनदी लेखापाल, कंपनी सेक्रेटरी व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उमेद्वारांनी त्यांची सनद (अर्हता दस्तऐवज) अर्जासोबत सादर करावीत.

४) अशा अधिकाऱ्या-विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

५) निश्चित केलेल्या कालावधीत काम पूर्ण करणेच्या हमी बाबत संबंधित उमेदवारास बंधपत्र सादर करावे लागेल.

६) करार पध्दतीने नियुक्ती करतांना सेवा निवृत्त अर्जदाराचे वय ५९ वर्षे ते ६५ वर्षे या दरम्यान असावे.

७) सेवा निवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

८) प्रथमतः विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करणेत येईल व तद्नंतर पात्र उमेद्वारांना **दिनांक ०८/०१/२०२५ रोजी** किंवा प्रशासकीय सोईनुसार परिवहन उपक्रम मुख्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शंकरराव चौक, कल्याण (प.) येथे प्रत्यक्ष मुलाखतीस बोलविण्यात येईल. यासाठी संबंधित उमेद्वारांनी अर्जामध्ये आपला **संपर्क क्रमांक** व **मेल आय.डी.** नमुद करणे आवश्यक राहील.

९) इच्छुक उमेदवारांनी त्यांना अपेक्षित असलेले मानधन अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक राहील.

१०) सनदी लेखापाल व कंपनी सेक्रेटरी करीता जॉईन्ट व्हेंचर अथवा टिमवर्कनुसार काम करणाऱ्या कंपनीने एकच अर्ज/प्रस्ताव सादर करावा.

११) इच्छुक उमेदवारांची निवड करत असतांना त्यांची पात्रता, अनुभव विचारात घेवून कोणत्याही श्रेणीतील उमेद्वाराची निवड करण्याचे किंवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण यांना राहतील.

**(मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महोदया यांच्या दिनांक ०१/०७/२०२४ रोजीच्या मान्यतेने)**

(डॉ. विजयकुमार द्वासे)
परिवहन व्यवस्थापक, केडिएमटी
तथा संचालक तथा सचिव
कल्याण महानगर परिवहन महामंडळ
मर्यादित, कल्याण.

जा.क्र./कडोंमपा/परि/मुका/१०५७ दिनांक १८ / १२ /२०२४.

## -: अर्जाचा नमुना :-

**प्रति,**
**मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,**
कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि.
शंकरराव चौक, कल्याण (प.)

फोटो

**अर्ज केलेल्या पदाचे नांव :-** .................................................................................. **या पदासाठी अर्ज**

**अपेक्षित मानधन रुपये :-** ................................. **अक्षरी रुपये :-** ...........................................................

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | कायमचा पत्ता | |
| ३ | दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) | |
| ४ | ई-मेल आय.डी. (अनिवार्य) | |
| ५ | सध्याचा पत्ता | |
| ६ | जन्म तारीख | |
| ७ | जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांक रोजीचे वय | |
| ८ | राष्ट्रीयत्व | |
| ९ | जात / प्रवर्ग | |
| १० | लिंग | |
| ११ | अवगत भाषा | |
| १२ | शैक्षणिक अर्हता | |

उर्वरित मजकुर पाठिमागे...

| १३ | अनुभव : | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

१४) सेवा निवृत्ती दिनांक :—...............................

१५) सनदी लेखापाल, कंपनी सेक्रेटरी व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील इच्छुक उमेदवारांनी त्यांच्या कार्यानुभवाचा तपशील आपल्या लेटर हेड वर कार्यादेश/अनुभव प्रमाणपत्र यांसह सादर करावा.

१६) सध्या कुठे काम करीत असल्यास त्याचा तपशिल :— ................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

१७) इतर विशेष उल्लेखनीय कार्य :— ......................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

...........................................................................................................

**माझी माहिती वर दिलेल्या तपशिलाप्रमाणे सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सूचने-शिवाय रद्द होईल याची मला जाणिव आहे.**

**ठिकाण :—** अर्जदाराचे नांव व सही

**दिनांक :—** ............................................